नियोजित स्वरूपाचे उपचार हे शासकीय रूग्णालयात घेण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन परिपत्रक क्र. वैखप्र-२०१९/प्र.क्र.२६/मशि-६
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई. - ४०० ०३२. दिनांक : ०५ जून, २०२३.

## परिपत्रक

शासनमान्य अशासकीय अनुदानीत महाविद्यालयामधील डॉ. कटारे भागवत जनार्दन, प्राचार्य, कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अंबड, जि. जालना यांनी त्यांच्या पत्नीच्या (श्रीमती मंदाकिनी कटारे) Adenocarcinoma with mestastasis spread over thorax, spine & pelvic bone (रक्ताचा कर्करोग) या आजारावर दिपक हॉस्पिटल, जालना या खाजगी रुग्णालयात दि.२६.०६.२०१८ रोजी बाह्यरूग्ण म्हणुन औषधोपचार घेतलेल्या वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीचा प्रस्ताव " विशेष बाब" म्हणून सचिव समितीच्या बैठकीत मान्यतेसाठी सादर करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाकडे पाठविण्यात आला असता,सार्वजनिक आरोग्य विभागाने डॉ. कटारे यांच्या पत्नीच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीस मान्यता देताना पुढीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत:-

"प्रस्तुत प्रस्तावातील डॉ. कटारे यांच्या पत्नीच्या आजारावरील उपचार हे नियोजित स्वरूपाचे आहेत तसेच सदर उपचार वारंवार घ्यावे लागत आहेत, ही बाब लक्षात घेता, डॉ. कटारे यांना पुढील उपचार शासकीय रूग्णालयात घेण्याबाबत सूचित करण्यात येत आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागाने सदर बाब त्यांच्या अधिनस्त कार्यालयातील सर्व अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणावी."

उपरोक्त अभिप्राय लक्षात घेता, " ज्या आजारावरील उपचार हे नियोजित स्वरूपाचे असतील, तसेच वारंवार घ्यावे लागत असतील तर अशा आजारावरील उपचार हे शासकीय रूग्णालयात घेण्यात यावेत. " ही बाब विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालयांमार्फत त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व अनुदानित महाविद्यालयांतील अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अमोल उगलमुगले)
कार्यासन अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग.

प्रति,

१) संचालक, उच्च शिक्षण, पुणे
२) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग.
३) सर्व अशासकीय अनुदानित महाविद्यालये (संबंधीत विभागीय सहसंचालकांमार्फत)
४) अवर सचिव, महाविद्यालयीन शिक्षण-५ , उच्च व तंत्र शिक्षण विभाग
५) कक्ष अधिकारी, महाविद्यालयीन शिक्षण-१ , उच्च व तंत्र शिक्षण विभाग
६) निवड नस्ती, महाविद्यालयीन शिक्षण -६

D:\वैशाली\वैदयकीय देयक\सार्वजनिक आरोग्य\बाह्यरुग्ण.docx